# <u>प्रेसनोट</u>

दिनांक १९/०८/२०१९

**व्यावसायीकास बनावट पिस्तोलचा धाक व पोलीस असल्याचे सांगुन, मारहाण करून जबरदस्तीने रोख रक्कम लुटणा-या सराईत गुन्हेगारांना मध्यवर्ती कक्ष,गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडुन अटक**

---

दिनांक १२/०८/२०१९ रोजी रात्री २१.३० दरम्यान नेरूळ रेल्वे स्टेशन येथे संगणक व्यावसायिक त्याचे पार्क केलेल्या कारमध्ये बसत असताना अचानक पोलीस असल्याचे सांगुन बनावट पिस्तोलचा धाक दाखवुन त्याचेकडे पैशाची मागणी केली, त्यांना पैसे देण्यास नकार दिल्याने फिर्यादीस बनावट पिस्तोल व हाताने मारहान करून त्यांचेकडील रू. ८६,०००/- रोख रक्कम जबरदस्तीने लुटुन नेली होती. सदर बाबत नेरूळ पोलीस ठाणे गु.र.क्र. ३६७/२०१९ भादवि कलम ३९४,१७०,३४ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

मा. पोलीस आयुक्त सो, मा. पोलीस सह आयुक्त सो नवी मुंबई यांनी सदरचा गंभीर गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे पोलीस उप आयुक्त सो, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखे मार्फत समांतर तपास सुरु केला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास चालु असताना मध्यवर्ती कक्षाचे अधिकारी/अंमलदार यांना नमुद गुन्हयातील आरोपींबाबत गोपनिय बातमी मिळाली. त्यानुसार अजीवलीगाव, ता. पनवेल येथुन **१) शुभम सुभाष पाटील वय २४ वर्षे, धंदा रिक्षा चालक, रा. अजीवलीगाव, ता. पनवेल, जि. रायगड व वडझिरेगाव, ता. पारनेर जि. अहमदनगर येथुन २) विशाल सोपान मोरे वय १९ वर्षे, यास वडझिरेगाव, ता. पारनेर, जि. अहमदनगर** येथुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता सदरचा गुन्हा त्यांनी केल्याची कबुली दिल्याने नमुद गुन्हयात त्यांना दिनांक १३/०८/२०१९ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

तसेच तपासामध्ये त्यांनी दि. ०७/०३/२०१९ रोजी मध्यरात्री खारघर येथील एका कॅम्प्युटर दुकाणाचे शटर तोडुन दुकानातील रू. २,५०,०००/-रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्यावरून खारघर पोलीस ठाणे गु.र.क्र. १३४/२०१९ भादवि कलम ४५७, ३८० अन्वये दाखल गुन्हाही उघडकीस आलेला आहे.

सदरचे गुन्हे अथक परिश्रम घेवुन उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर यांचेसह, सहा. पोलीस निरीक्षक राजेश गज्जल, निलेश तांबे, मपोउनि आर. टी. काळे, सफौ संजय पवार, पोह/पोपट पावरा, सतिश सरफरे, ज्ञानेश्वर बनकर, प्रदीप कदम, शशिकांत शेंडगे, अनिता पवार, पोना/विजय पाटील, नवनाथ कोळेकर, सचिन धनवटे, प्रकाश सांळुखे, विष्णु पवार, मिथुन भोसले, दिलीप भास्करे, युवराज जाधव, सागर हिवाळे, सतिश चव्हाण, उर्मिला पवार, पोशि/मेघनाथ पाटील, यांनी केलेली असुन गुन्हयाचा पुढील तपास मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, याचेकडुन चालु आहे.

************